आदिवासी व बिगरआदिवासी भागातील बहुवर्ग अद्यापन होत असलेल्या प्राथमिक शाळांच्या सद्यस्थितीचा अभ्यास

श्री.ए. के. करवर
संशोधक

प्रा. डॉ. व्ही.के. बामने
संशोधन मार्गदर्शक

सारांश :

बहुवर्ग अध्यापनाच्या आदिवासी व बिगर आदिवासी प्राथमिक शाळांच्या सद्यस्थितीचा विचार करता, भौतिक सुविधा मानवी सूविधा आदिवासी भागात नाहीत. तुलनेने या सुविधा बिगर आदिवासी भागात अधिक चांगल्या आहेत. शाळा निरीक्षक, मुख्याध्यापक, शासन, स्वत: शिक्षक यांनी मानवी, भौतिक घटकांत योग्य तो बदल करणे, उपलब्ध करणे, पुरेपुर आणि आवशकते नुसार वापर करणे आवश्यक आहे.

प्रस्तावना :

'भारताचे भवितव्य वर्गावर्गातून घडते आहे', असे कोठारी कमीशन सांगते. परंतु लोकसंख्या अधिक असलेल्या आपल्या देशात आपण १००% पटनोंदणी, १००% गुणवतापूर्ण शिक्षण व १००% टिकवणुक अजूनही पूर्णत: करू शकलेलो नाही त्यातच प्राथमिक स्तरावर बहुवर्ग अध्यापन, आदिवासी भाग, तेथील सोयी, सुविधा त्यांची उपलब्धता, वापर यांचा बिगर आदिवासी भागातील बहुवर्गाच्या शाळेशी तुलना करता निश्चितच फरक आहे. शिक्षक, उपस्थिती अनुदाने, सेवा सवलती, उपक्रम, योजना, अर्थातच मानवी व भौतिक संसाधनांच्या सदर्भातील सद्यस्थिती कळाली.

संशोधनाची गरज:

बहुवर्ग अध्यापनाच्या आदिवासी व बिगर आदिवासी भागातील प्राथमिक शाळांमधील विविध साधनांची स्थिती, वापर विविध सुविधांची सद्यस्थिती, शाळातील अध्ययन–अध्यापन पूरक उपक्रम सद्यस्थिती, तसेच अनुदाने, शेरेबुकातील नोंदी, शिक्षक उपस्थिती , विशेष नोंद, उपक्रम यांची माहिती मिळते. म्हणून सदर विषयाचे संशोधन करण्याची गरज वाटते.

संशोधनाचे महत्व :

आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्गाच्या प्राथमिक शाळांमधील साधनसुविधा, अध्ययन–अध्यपना, उपक्रम, अनुदाने, शेरेबुक नोंदी, शिक्षक उपस्थिती यांची सद्यस्थितीची माहिती कळाल्याने मुख्याध्यापक, शाळानिरीक्षकांना आपले लक्ष अध्यापन कार्याकडे योग्यपणे देता येईल. परिणामी प्रभावी, परिणाकारक व यशस्वी अध्ययन–अध्यापन प्रक्रिया होईल. म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

१. शाळातील भौतिक संसाधनांची उपलब्धता व वापर शोधणे.
२. शाळांतील विविध सुविधांची सद्यस्थिती शोधणे.
३. शाळेतील उपलब्ध साधन-सामग्री शोधणे.
४. इतर अनुदाने, शेरेबुक नोंदी, उपस्थिती, उपक्रम बाबींची सद्यस्थिती जाणून घेणे.

पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या:

१. आदिवासी भाग:-दुर्गम, अनु.जाती,जमातीचे वास्तव्य, डोंगराळ असलेला भाग.
२. बिगर आदिवासी भाग:-साधन, वाहतुक व पर्यावरण अनुकूलता, मागास व्यतिरिक्त प्रवर्ग असलेला भाग.
३. बहुवर्ग अध्यापन:-एकावेळी एकापेक्षा अधिक वर्गाना अध्यापन करणे.

संशोधन प्रश्न:

१. आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्ग प्राथमिक शाळांमध्ये कोणकोणत्या भौतिक संसाधनाचा वापर होतो?
२. शाळेतील सुविधांची स्थिती कशी आहे?
३. शाळेतील इतर/विविध बाबींची सद्यस्थिती काय आहे?

गृहितके

आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्ग प्राथमिक शाळांतील भौतिक संसाधने, अध्ययन,अध्यापनासाठी उपक्रम, अनुदाने इ. अत्यावश्यक बाबी असतात.

संशोधनाची व्याप्ती :

मराठी माध्यमांच्या, जिल्हा परीषदेच्या व आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्ग अध्यापन होय असलेल्या प्राथमिक शाळा, त्यांतील बहुवर्ग अध्यापन होत असलेल्या, प्राथमिक शाळा, त्यांतील मानवी व भौतिक घटक.

संशोधनाची मर्यादा :

आदिवासी व बिगरआदिवासी भागातील बहुवर्ग प्राथमिक शाळातील फक्त मानवी व भौतिक संसाधने, उपलब्धता, वापर, अध्ययन व अध्यापन पुरक बाबींचाच विचार केलेला आहे.

परीमर्यादा :

आदिवासी भागातील व बिगर आदिवासी भागातील इ. १ते ४ व इ. १ ते ७ च्या बहुवर्ग प्राथमिक शाळा, अहमदनगर जिल्हातील फक्त अकोले तालुक्यातील बहुवर्ग प्राथमिक शाळा व त्यातील फक्त भौतिक व मानवी संसाधनांची उपलब्धता व वापराची सद्यस्थितीचाच येथे विचार केलेला आहे.

जनसंख्या :

१	**आदिवासी भागातील बहुवर्ग प्राथ.शाळा**	२०८
२	बिगर आदिवासी बहुवर्ग प्राथ.शाळा	१०७

न्यादर्श नमुना निवड :

आदिवासी भागातील फक्त १०७(५१.४४टक्के) बहुवर्ग प्राथमिक शाळांची यादृच्छिक पध्दतीने तर बिगर आदिवासी भागातील सर्वच १०७ (५१.४४टक्के) बहुवर्ग प्राथमिक शाळांची सहेतुक पध्दतीने निवड केली.

संशोधन साधने :

पडताळा सूची (शाळा भेट/निरीक्षण नोंद) सदर पडताळा सूचीत १ ते ४ भाग, बध्द प्रश्न- ५१, मुक्त प्रश्न- ३, एकूण = ५४ प्रश्न होते.

साधनाची सत्यता व विश्वसनियता :

विविध एम.फिल, पी.एच.डी. मार्गदर्शकांकडून सदर पडताळा सूचीचे योग्य विकसन करण्यात आले.

माहिती संकलन प्रक्रिया :

प्रत्यक्ष बहुवर्गाच्या (१०७ + १०७ = २१४) शाळांना भेट देउन प्राप्त माहिती पडताळा सूची मध्ये नोंद करण्यात आली. (अर्थातच समक्ष माहिती संकलन केली.)

मूल्यांकन तथा निश्लेषण पध्दती :

सदर पडताळा सुचीद्वारे केलेल्या नोंदीवरून पुढील मूल्यांकन तथा विश्लेषण करण्यात आले.

भाग १- विविध साधनांची उपलब्धता व वापर- यात आदिवासी भागात दूरदर्शन संच, C.D,D.V.D.,L.C.D., संगीत साहित्य कमी व उपलब्ध साधने सुस्थितीत नाहीत. बिगर आदिवासी भागात संगीत साहित्य, कपाट L.C.D., अध्ययनकार्ड नाहीत.

भाग २ - शाळेतील विविध सुविधा स्थिती- आदिवासी भागात मैदाने, कंपाउंड, संगणक कक्ष, अध्ययन पूरक साधनांची उपलब्ध पाहता, आदिवासी शाळांत बाक, डेस्क, नाही तर बिगर आदिवासी भागात, कोबा, बैठक नाही. तसेच दोन्हीही भागातील शाळांत शाळा निरीक्षक मार्गदर्शन करतात.

भाग ४ - इतर बाबींमध्ये- दोन्हीही भागातील शाळांना अनुदाने मिळतात. आदिवासी भागातील शाळांना अधिक सुधारणात्मक शेरे दिलेले आहेत. तसेच शिक्षक अधिक हजर होते. बिगर आदिवासी भागातील शाळांच्या तुलनेत आदिवासी शाळात अभ्यास व अध्ययन पूरक उपक्रम कमी आहेत. तसेच दोन्हीही शाळांत विशेष उपक्रम अत्यल्प आहेत.

संशोधन प्रश्नांची उत्तरे :

१. आदिवासी व बिगर आदिवासी बहुवर्ग प्राथमिक शाळांत तंत्रज्ञानावर आधारित साहित्य, अध्ययनकार्ड अत्यल्प असून सुस्थितीत कमी आहे.
२. शाळांमध्ये कंपाउंड, संगणक कक्ष, पाणी सुविधा कमी आहे.
३. दोन्हीही भागातील शाळांना अनुदाने मिळतात, आदिवासी शाळांना सुधारणात्मक शेरे आहेत आणि दोन्हीही ठिकाणी उपक्रम कमी आहेत.

मुख्य निष्कर्ष:

१. आदिवासी भागातील बहुवर्गाच्या प्राथमिक शाळांत तांत्रिक साहित्य, संगीत साहित्य, मैदाने, कंपाउंड, पाणी, स्वच्छतागृह, बाक, डेस्क नाहीत. प्रतिकुल शेरे आहेत. उपक्रम कमी आहेत.
२. बिगर आदिवासी भागातील बहुवर्गाच्या शाळांत सुरक्षा कपाट, अध्ययन कार्ड, वीज, कंपाउंड, मैदाने, रॅम्प, पिण्याचे पाणी कमी आहे. कोबा, बैठक व्यवस्था नाही. अधिक शिक्षक रजेवर (किरकोळ रजा, प्रशासकीय काम, इतर) होते.

३. आदिवासी व बिगर आदिवासी बहुवर्ग प्राथमिक शाळांत शाळा निरीक्षक मार्गदर्शन होते, सर्वच शाळांना अनुदाने मिळतात.

उपाय :

१. आदिवासी भागातील बहुवर्गाच्या प्राथमिक शाळांना आवश्यक तांत्रिक साहित्य, पाणी, बैठक व्यवस्था पुरविण्यात यावी.
२. बिगर आदिवासी भागातील बहुवर्गाच्या प्राथमिक शाळांना सुरक्षा कपाट, अध्ययन कार्ड, आवश्यक भौतिक सुविधा, गरजेनुसार उपलब्ध करावे.
३. आदिवासी व बिगर आदिवासी बहुवर्ग प्राथमिक शाळांत आवश्यक भौतिक मानवी सुविधा गरजेनुसार पुरवाव्यात.

शिफारशी :

१. आदिवासी व बिगर आदिवासी बहुवर्ग प्राथमिक शाळांमध्ये आवश्यक मानवी, भौतिक सोयी सुविधा शासन, समाज यांनी पुरवाव्यात, त्या साठी शाळानिरीक्षकांमार्फत पाठपुरावा व्हावा. २. स्वत: शिक्षकाने प्रयत्नशिल राहावे.

पुढील संशोधनासाठी विषय:

१. आदिवासी व बिगर आदिवासी प्राथमिक शाळांच्या प्राप्त गुणवतेचा तुलनात्मक अभ्यास.
२. बहुवर्ग प्राथमिक शाळांच्या गुणवतेची सद्यस्थिती.
३. बहुवर्गासाठीच्या विद्यार्थी अध्ययन क्षमता विकसनासाठीच्या परिणामकारक अध्ययन अध्यापन पदधती- एक अभ्यास.

समारोप:

आदिवासी व बिगर आदिवासी भागातील बहुवर्गाच्या प्राथमिक शाळांपैकी कमी भौतिक साधन सुविधा, प्रतिकुल शेरे आदिवासी भागातील शाळांना अधिक आहेत. इतर मानवी व भौतिक साधन सुविधा अध्ययन पुरक वातावरण आदिवासी भागाच्या तुलनेने बिगर आदिवासी भागात चांगले आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. दुनाखे, अरविंद, (१९९७), 'आधुनिक भारतीय शिक्षण, पुणे', नुतन प्रकाशन.
२. पंडीत, बन्सीबिहारी, (२००८) 'शिक्षणातील संशोधन', पुणे नित्यनूतन प्रकाशन पृष्ठ २५०.
३. भोसले रमा अ. (डॉ.) डोणे उज्वला म. (डॉ.) 'शिक्षणातील बदलते विचार प्रवाह', कोल्हापूर, फडके प्रकाशन.
४. कर्णिक व गोखले, (१९६२) 'प्राथमिक शिक्षणाच्या समस्या', पुणे ठोकळ प्रकाशन, पृष्ठ क्र. ७८,८१,८६,
५. पाटील (डॉ) लीला कुलकर्णी विश्वंभर, (१९९३), 'आजचे शिक्षण आजच्या समस्या', पुणे, श्री. विद्याप्रकाशन, पृष्ठ क्र. ३०,५३ ते ५५,
६. मराठे, एम.जी. (२००३), 'प्राथमिक शाळेतील बहुवर्ग अध्यापन शिक्षण हस्तपुस्तिका', पुणे, SCERT, पृष्ठ क्र. १ ते १४०
७- वेबसाईट: www.bhasharesearch.org.in २- www.schoolnetindia.com.